RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१७६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.७ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बांगलादेशला जाणारे कांद्याचे रोजचे ८० ट्रक जागेवर थांबले, विमाने रद्द, सीमेजवळ जाणे टाळण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ ढाका**

अराजकतेनंतर या देशासह भारताने आपल्या सीमा सील केल्या असून, बांगलादेशमध्ये भारताकडून होत असलेली शेतमालाची आयातही थांबली आहे. बांगलादेश भारताकडून जवळपास ७५ टक्के शेतमाल आयात करीत असल्याने या घडामोडीने दोन्ही देशांचे नुकसान होणार आहे.

नाशिकमधून दररोज ६० ते ७० ट्रक कांदा दररोज बांगलादेशला ट्रकद्वारे रवाना होतो. एका ट्रकमध्ये तीस टन कांदा भरला जातो. मात्र, कांद्याची वाहतूक थांबली



असल्याचे कांदा निर्यातदारांनी सांगितले. मागील आठवड्यात बांगलादेशकडे रवाना झालेले कांद्याचे शेकडो ट्रक भारत-बांगलादेश सीमेवर अडकून पडले आहेत. हा कांदा कमी भावात कोलकात्यातच विकण्याची आफत ओढवू शकते. नाशिक जिल्ह्यातून द्राक्ष अन् कांद्याची मोठ्या प्रमाणात बांगलादेशात निर्यात केली जाते.

**बिहारमध्ये अलर्ट जारी**

बिहारच्या अनेक भागांत अलर्ट जारी करण्यात आला आहे. केंद्रीय निमलष्करी दलांसह पोलिसांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्याची सीमा नेपाळशी आहे, ज्याचा वापर इतर देशांतील घुसखोर भारतात प्रवेश करण्यासाठी करतात, असे पोलिसांनी सांगितले.

**सीमेजवळ जाणे टाळा...**

सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) बांगला देशातील बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ४,०९६ किमी लांबीच्या भारत-बांगलादेश आंतरराष्ट्रीय सीमेवर राहणाऱ्या लोकांना सीमावर्ती भागात, विशेषत: रात्रीच्या वेळी अनावश्यक जाऊ नका, असे आवाहन केले आहे.

**विमाने रद्द**

एअर इंडिया, इंडिगोसह भारतातील काही प्रमुख कंपन्यांनी बांगलादेशासाठीची विमानसेवा तातडीने स्थगित केली आहे. प्रवाशांची सुरक्षा आमच्यासाठी सर्वांत महत्त्वाची असून, विमानसेवा स्थगित केल्याचे विमान कंपन्यांनी सांगितले.

**भारताच्या वस्त्रोद्योगावर परिणाम**

बांगलादेशातील राजकीय संकट भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी चिंतेचा विषय झाला आहे. येथील कोणत्याही पुरवठ्यात व्यत्यय आल्यास त्याचा पुरवठा साखळीवर तत्काळ परिणाम होईल, त्यामुळे भारतीय कंपन्यांच्या उत्पादनावर आणि पुरवठ्यावर परिणाम होईल, असे भारतीय कापड उद्योग परिसंघाने (सिटी) म्हटले आहे.

## जयंत पाटील म्हणतात.....ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका पुढे ढकलल्या जाणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ मुंबई**

आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून शिवस्वराज्य यात्रेचा टिझर प्रसिद्ध करण्यात आला. यावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेला जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, अनिल देशमुख, राजेश टोपे आणि सुनील भुसारा हे नेते उपस्थित होते. जयंत पाटील यांनी यावेळी बोलताना मोठा दावा केला आहे. महाराष्ट्र सरकार घाबरलं आहे. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये होणारी निवडणूक पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताहेत, असं ते म्हणाले आहेत. त्यांच्या या दाव्यामुळे चर्चांना सुरुवात झाली आहे.



जयंत पाटील म्हणाले की, ९ ऑगस्टला शिवनेरी किल्ल्यावरून शिवाजी महाराजांचे आशीर्वाद घेणार आहोत. त्यानंतर महाराष्ट्रात शिवस्वराज्य यात्रा-२ ही आम्ही सुरू करतोय. जुन्नर पासून यात्रा सुरू होईल. सकाळी ९ वाजता शिवनेरी किल्ल्यावर जाणार आहे. त्यानंतर यात्रा सुरू होईल.

राज्यातील कायदा सुव्यस्था कशी ढासळली आहे. बेरोजगारी कशी वाढली आहे, हे सरकार आल्यानंतर महाराष्ट्र कसं मागे गेलं आहे. हे आम्ही जनतेपर्यंत घेऊन जाणार आहोत. सरकारचे काळे कारनामे आम्ही जनतेसमोर घेऊन जाणार आहोत, असं म्हणत जयंत पाटील यांनी सरकारवर निशाणा साधला. आम्ही ज्या ठिकाणी लढणार आहोत अशा मतदारसंघात आम्ही यात्रा काढतोय, असं त्यांनी सांगितलं.

## नखं कापली केस कापली अन् रक्तसुद्धा काढलं; मात्र, वजन प्रकारात विनेशची हार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ पॅरीस**

भारताची कुस्तीपटू विनेश फोगटला पॅरिस ऑलिम्पिकसाठी अपात्र ठरल आहे. काल रात्री ५० किलो गटाच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या विनेश फोगटचे वजन निर्धारित वजन मर्यादेपेक्षा जास्त असल्याचं आढळून आलं त्यानंतर तिला स्पर्धेतून अपात्र ठरवण्यात आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री विनेश फोगटचे वजन २ किलो जास्त होते आणि तिने ते कमी करण्यासाठी खूप मेहनत घेतली. रिपोर्ट्सनुसार, जेव्हा तिने सेमीफायनल मॅच जिंकली तेव्हा तिचं वजन सुमारे ५२ किलो होते आणि नंतर तिचं वजन २ किलोने कमी करण्यासाठी तिने तिचं रक्त देखील काढलं.

**रक्त काढलं**

विनेश फोगटने सेमीफायनल जिंकल्यानंतर आराम केला नाही. तिने रात्रभर जागून तिचे अतिरिक्त वजन कमी करण्याचा खूप प्रयत्न केला. स्पोर्ट्स स्टारच्या रिपोर्टनुसार, विनेश फोगटने वजन कमी करण्यासाठी सायकल चालवली, तिने स्किपिंग केलं. एवढंच नाही तर या खेळाडूने आपले केस आणि नखेही कापले. मोठी गोष्ट म्हणजे या खेळाडूने तिचे रक्तही काढले पण असे असूनही ती केवळ ५० किलो, १५० ग्रॅमपर्यंत पोहोचू शकली.

**खूप प्रयत्न केले**

कुस्तीमध्ये, कोणत्याही कुस्तीपटूला फक्त १०० ग्रॅम जास्त वजनाचा भत्ता मिळतो. म्हणजे, विनेशचे वजन ५० किलो किंवा १०० ग्रॅम असते तर ती सुवर्णपदकाची लढत खेळू शकली असती, पण तिचे वजन ५० ग्रॅम जास्त होते आणि त्यामुळे तिचे ऑलिम्पिक पदक जिंकण्याचं स्वप्न भंगलं. कुस्तीमध्ये कुस्तीच्या सामन्यांपूर्वी पैलवानांचे वजन केलं जाते. याशिवाय कुस्तीपटूला त्याच श्रेणीत आपलं वजन २ दिवस राखायचं आहे परंतु विनेशला तसे करता आले नाही. रिपोर्ट्सनुसार, तीचं वजन ५२ किलोपर्यंत पोहोचलं होतं, तीने ते कमी करण्याचा खूप प्रयत्न केला पण शेवटी तो अपयशी ठरला.

## अभिजीत अडसूळ यांचा रवी राणांवर हल्लाबोल; रवी राणा यांना 'छपरी' संबोधले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

अभिजीत अडसूळ म्हणाले, आनंदराव अडसूळ यांना अमित शहा यांनी राज्यपाल पदाचा शब्द दिला होता, मात्र तो शब्द पाळला गेला नाही. शिवसेनेने दोन राज्यपाल पद देण्याचे आश्वासन दिले होते. दोन वर्ष झाली त्याला, मात्र रवि राणा वाचाळ बोलतात. राणा यांनीच त्यांच्या पत्नीचा घात करून त्यांना पाडलं.असा थेट हल्ला बोल आजी आ.कॅप्टन अभिजित अडसूळ यांनी आ.रवी राणा यांच्यावर केला.

अभिजीत अडसूळ यांनी आरोप केला की, जिल्ह्यातील एकाही नेत्यासोबत राणा यांचे चांगले संबंध नाहीत. महायुतीत खडा टाकण्याचं काम रवी राणा करत आहेत. शिवसेनेच्या नेत्याबाबत आर्वाच्च बोलणं योग्य नाही. खोटी प्रमाणपत्र बनवून रवी राणा यांनी जनतेचा विश्वासघात केला. जनतेने त्यांना जागा दाखवली.



आनंदराव अडसूळ हे महायुतीचे नेते आहेत. आमच्या नेत्याबाबत अशी भाषा वापरली जात असेल तर युतीत रहायचं की नाही हाही विचार करावा लागेल.

**महायुतीतून हकालपट्टीची मागणी**

राणांचा इतिहास पाहा, सत्तेत जो पक्ष असतो त्या पक्षाचे नेते यांचे देव असतात. बच्चू कडू हे रवी राणांमुळे महायुतीतून दूर गेलेत. राणांना महायुतीतून बाहेर काढा अन्यथा आम्ही महायुतीत रहायचं का हे तरी सांगा. ब्लॅकमेलिंग करणं हे आमच्या रक्तात नाही. बाळासाहेबांनी आम्हाला स्वाभिमानाने जगायला शिकवलं, मात्र आमच्या नेत्याबद्दल बोलवून आमचा स्वाभिमान दुखावला जात असेल तर नक्कीच याचा विचार केला जाईल, असे अभिजीत अडसूळ यांनी सांगितले.महायुतीतील नेत्यांवर छपरी आमदार अपमान कारक बोलत असतील तर आम्हालाही निर्णय घ्यावा लागेल, असे अभिजीत अडसूळ म्हणाले.

## लाडकी बहीण योजनेचे दोन्ही हप्ते १७ ऑगस्टला जमा होणार, ३ हजार रुपये खात्यात येणार!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी१ कोटींपेक्षा जास्त अर्ज शासन दरबारी प्राप्त झाले असून या अर्जाचा ओघ अद्यापही कायम आहे. कारण, राज्य सरकारने १५ ऑगस्टची मुदत वाढवून आता ३१ ऑगस्टपर्यंत लाडक्या बहिणींना अर्ज करण्यासाठी मुभा दिली आहे. त्यामुळे, लाडकी बहीण योजनेसाठी महिलांकडून मोठ्या प्रमाणात अर्ज केले जात आहेत. त्यातच, आता, लाडक्या बहिणींसाठी आणखी एक गुडन्यूज आली आहे. त्यानुसार, १७ ऑगस्ट रोजीच या योजनेचा पहिला हफ्ता




३००० रुपये महिलांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे, रक्षाबंधनापूर्वीच बहिणींना ओवाळणी मिळणार असल्याचे स्पष्ट झालं आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टलाच मिळणार असून याबाबत शासन दरबारी निर्णय झाला आहे. विशेष म्हणजे १७ ऑगस्ट रोजी राज्य सरकारकडून भव्य दिव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून हे पैसे वितरीत केले जाणार आहेत. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. या कार्यक्रमाला एकाच मंचावरती मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित असणार आहेत. तर, प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री या कार्यक्रमातून उपस्थित राहतील. १७ ऑगस्टला दोन ते अडीच कोटी महिलांना पहिला हप्ता देण्याच्या संदर्भामध्ये राज्य सरकारचा विचार असल्याचीही माहिती आहे. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे योजनेसाठी पात्र झालेल्या महिला भगिनींना मोठा दिलासा मिळाला आहे.


तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर महिलांच्या आलेल्या अर्जांची आकडेवारी समोर येत आहेत. त्यामध्ये, महिला भगिनींचे मंजूर अर्ज, प्रलंबित अर्ज आणि नामंजूर अर्जही देण्यात येत आहेत. तर, प्रलिंबित अर्जांमधील काही त्रुटी दुरुस्त करून ते मंजूर केले जाणार आहेत. तर, नामंजूर करण्यात आलेल्या अर्जांना पुन्हा नव्याने अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. आतापर्यंत १ कोटी ४० लाख अर्ज दाखल झाले असून त्यापैकी १ कोटी अर्जांची छाननी ही पूर्ण झालेली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली असून आता त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. या योजनेचा पहिला हप्ता ररक्षाबंधनच्या मुहूर्तावर दिला जाणार आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचा एकत्रित हप्ता म्हणजेच ३ हजार रुपये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट १७ ऑगस्ट रोजी जमा होणार आहेत.

## 'उमेदवारी रद्द झाल्याचा आदेश मिळालाच नाही', पूजा खेडकरची हायकोर्टात धक्कादायक माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७पुणे**

माजी प्रशिक्षणार्थ आयएएस अधिकारी पूजा खेडकरने दिल्ली उच्च न्यायालयात केलेल्या दाव्यामुळे पुन्हा खळबळ निर्माण झाली आहे. खेडकरच्या वकिलाने आज सुरू असलेल्या सुनावणी दरम्यान न्यायालयाला सांगितले की, यूपीएससीने माझी उमेदवारी रद्द केल्याबाबतचे कोणतेही अधिकृत पत्र मिळाले नाही. पूजाला ही सर्व माहिती प्रसार माध्यमातूनच मिळाली आहे.

युपीएससीने उमेदवारी रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पूजा खेडकरने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. दिल्ली उच्च न्यायालयाची हंगामी मुख्य न्यायाधीश मनमोह यांच्या खंडपीठासमोर बुधवारी ही सुनावणी झाली.



युपीएससीने १३ जुलै रोजी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून पूजा खेडकरची उमेदावारी रद्द करण्याचा आणि तिला इथून पुढे युपीएससीच्या परीक्षेला बसू न देण्याचा निर्णय घेतला होता.

पूजा खेडकरने युपीएससीच्या परीक्षा देताना नावात बदल करणे, खोटी कागदपत्रे वापरणे आणि मर्यादेपेक्षा जास्त वेळा परीक्षा देणे यासारखे प्रकार केले होते. यामध्ये ती दोषी अढळल्यानंतर युपीएससीने कारवाई केली होती.या प्रकरणाची सुनावणी वेळी ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी पूजा खेडकरची बाजू मांडली. यावेळी जयसिंग यांनी प्रेस रीलिझचा संदर्भ देताना सांगितले की, या प्रकरणातील विचित्र गोष्ट म्हणजे माझी उमेदवारी रद्द करण्याचा आदेश आजपर्यंत मला मिळालेला नाही. त्यामुळे त्यांनी प्रसार माध्यमांद्वारे दिलेला आदेश रद्द करत नवा आदेश द्यावा जेणेकरूण मला योग्य न्यायाधिकरणाकडे जाता येईल असे, जयसिंग म्हणाल्या.यावर युपीएससीने उच्च न्यायालयात सांगितले की, ते पूजा खेडकरला दोन दिवसांत तिची उमेदवारी रद्द केल्याच आदेश देणार आहेत.

दरम्यान उच्च न्यायालयाने पूजा खेडकरवा उमेदवारी रद्द करण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी योग्य मंचाकडे जाण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

## शिष्यवृत्तीचे नियम बदलले; एकास एकदाच मिळेल लाभ, परदेशी शिक्षणासाठी १५०० डॉलर मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ मुंबई**

खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणासाठीच्याशिष्यवृत्ती नियमांमध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने बदल केले आहेत. भारतातील विद्यापीठात पदवी परीक्षा किमान ५५ टक्के गुणांसह उत्तीर्ण केलेली असेल अशा विद्यार्थ्यांनाही परदेशात पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदवी प्राप्त करण्यासाठी आता शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

भारतातील विद्यापीठातून किमान ५५ टक्के गुणांसह पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती दिली जाईल. परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ एका विद्यार्थ्याला फक्त एकदाच घेता येईल. मात्र, या योजनेंतर्गत पदव्युत्तर पदवीचा अभ्यास सुरू असताना त्या विद्यार्थ्यास पीएच.डीसाठी शासन निर्णयात समाविष्ट विषयांमध्ये दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विद्यार्थी याच योजनेंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी लाभ घेण्यास पात्र राहील. मात्र, त्यासाठी विद्यार्थ्याने अर्ज करून मान्यता घेणे बंधनकारक असेल.एका कुटुंबातील दोन मुलांना परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. तसे प्रतिज्ञापत्र पालकांनी देणे अनिवार्य असेल. निर्वाह भत्ता/इतर खर्च/ आकस्मिक खर्चदेखील विद्यार्थ्यांना दिला जाईल. अमेरिका व इतर देशांसाठी (ब्रिटन वगळून) १५०० यूएस डॉलर आणि ब्रिटनसाठी ११०० ब्रिटिश पाऊंड इतकी रक्कम दिली जाईल.

## संपादकीय ......

# सामरिक सज्जतेला नवी जोड

भारताची संरक्षण सिद्धता अलीकडच्या काळात वाढत चालली आहे. शेजारील देशांकडून होणारा उपद्रव आणि सीमेवरच्या घातपाती कारवाया पाहता भारताने अधिकाधिक संरक्षणदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असून, त्या दृष्टीने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहे. विशेषत: जम्मू-काश्मीरचा आंतरराष्ट्रीय सीमाभाग आणि चीन सीमेलगतचा भाग अधिक सुरक्षित करण्यासाठी स्थानिक पातळीवर पायाभूत सुविधांचा वेगाने विकास केला जात आहे.

बॅलेस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या निर्मितीत भारताने घेतलेली आघाडी सुखद आणि स्वागतार्ह आहे. 'डीआरडीओ'ने (संरक्षण संशोधन आणि विकास संस्था) पाच हजार किलोमीटर पल्ल्यांपर्यंतचे लक्ष्य भेदणारे क्षेपणास्त्र आकाशतच नष्ट करण्याची क्षमता विकसित केल्याची बातमी सुखद आहे. चीन आणि पाकिस्तान यांच्याकडून होणार्या क्षेपणास्त्र चाचण्या पाहता भारतानेही या क्षेपणास्त्रांना प्रत्युत्तर देण्याची तयारी केली आहे. काही दिवसांपूर्वी ओडिशातील बालासोर परिसरातील गावांत संरक्षण शास्त्रज्ञ मोठा प्रयोग करत असल्याची चर्चा सुरू होती. यानुसार समुद्रकिनार्यालगतची अनेक गाव रिकामी करण्यात आली आणि या लोकांना सुरक्षित ठिकाणी नेण्याबरोबरच त्यांना आर्थिक भरपाईदेखील देण्यात आली. त्यानंतर नुकतेच शत्रूने सोडलेले क्षेपणास्त्र आकाशातच नष्ट करण्याची चाचणी यशस्वी झाली. एकप्रकारे भारतीय बॅलेस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या दुसर्या टप्प्याला यश आले आहे. याचा अर्थ भारत लवकरच महत्त्वाच्या शहरांत, संवेदनशील ठिकाणांच्या परिसरात अशा प्रकारच्या क्षेपणास्त्रभेदी सुरक्षा व्यवस्था विकसित करेल. या आधारावर शत्रूंकडून येणारे कोणतेही धोकादायक क्षेपणास्त्र आकाशातच नष्ट करता येईल.आपली प्रचंड लोकसंख्या पाहता देशाचे संरक्षण करण्यासाठी भारताकडे अशा प्रकारची संरक्षण व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे आहे. चाचणीदेखील अतिशय रंजकतेने पार पडली. सुरुवातीला एक क्षेपणास्त्र सोडण्यात आले आणि त्यानंतर जमीन आणि समुद्रात तैनात भारतीय रडारांनी त्या क्षेपणास्त्राचा वेध घेतला. चार मिनिटांच्या आतच जमिनीवरूनच प्रत्युत्तर देत बॅलेस्टिक क्षेपणास्त्राने आकाशात झेप घेतली आणि हवेतच ते क्षेपणास्त्र नष्ट केले. वास्तविक भारताने कमी अंतराचे, मध्यम पल्ल्याचे आणि लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र डागण्याचे तंत्र अवगत केलेले आहे. त्याचवेळी समोरून येणार्या क्षेपणास्त्राचा शोध घेत त्याला निष्प्रभ करण्याची क्षमता तयार करणेदेखील तितकेच महत्त्वाचे होते आणि त्यानुसार २००६ पासून भारतीय शास्त्रज्ञ तयारी करत होते. भारताने बॅलेस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण कार्यक्रमातील पहिला टप्पा पूर्ण केला असून, त्याचवेळी दुसर्या टप्प्यात नव्या श्रेणीतील इंटरसेप्ट सिस्टीम प्रबळ करण्याचे काम सुरू होते. कमी पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांना पाडण्याची क्षमता भारताने अगोदरच विकसित केली आहे; परंतु ५ हजार किलोमीटर अंतरावरून येणार्या क्षेपणास्त्रांना नष्ट करण्याची क्षमता तयार केल्याने भारतीय लष्कराचे सामर्थ्य हे एका उंचीवर पोहोचले आहे.अर्थात, भारताची भूमिका पहिला हल्ला करण्याची कधीच राहिलेली नाही आणि त्यामुळेच अशा क्षेपणास्त्रांचा मुकाबला करण्यात भारताने सिद्ध होणे गरजेचे होते. कदाचित, भविष्यात युद्ध होईल, असे गृहीत धरले तर भारताचा सामना हा क्षेपणास्त्र हल्ल्यांशीच होणार आहे. अशावेळी देशाला सुरक्षा कवच प्रदान करणे ही काळाची गरज आहे. भारताने एस-४०० नावाचे क्षेपणास्त्र सुरक्षा कवच रशियाकडून आयात केले आहे. आणखी काही पुरवठा होणे बाकी आहे. वास्तविक भारताने स्वत:चीच संरक्षण यंत्रणेची तटबंदी उभी करायला हवी. ताज्या माहितीनुसार, युद्धात अडकलेला रशिया आता भारताच्या संरक्षण गरजाही पूर्ण करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मास्को दौर्यानंतर संरक्षण पुरवठ्यात वाढ झाली आहे. रशिया आपल्याला १२० क्षेपणास्त्रे देणार असून, ती क्षेपणास्त्रे सामरिक दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणांजवळ तैनात करावी लागणार आहेत. तूर्त भारतीय संरक्षण दलाचे भवितव्य उज्ज्वल आहे आणि यासाठी आणखी शक्तीनिशी वेगाने काम करायला हवे.

# महिला महाविद्यालय येथे, महिला सुरक्षा व सायबर सिक्युरिटी मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती-** पोलीस हे समाजाचे मित्र असून समाजाला योग्य वेळी योग्य मदत करण्यासाठी तत्पर आहेत. महिला सुरक्षा कायदे महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आले असून त्याची माहिती त्यांनी घेऊन सजग राहणे आवश्यक आहे असे मत पोलीस निरीक्षक श्रीमती विजया पंधरे यांनी महिला महाविद्यालय येथे महिला सुरक्षा व सायबर सिक्युरिटी या अत्यंत संवेदनशील व महत्त्वाच्या विषयावर बोलताना व्यक्त केले. स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय, जोग चौक, अमरावती येथेमंगळवार दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी पोलीस स्टेशन सिटी कोतवाली अंतर्गत महिला सुरक्षा व सायबर सिक्युरिटी या विषयावर सविस्तर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, क्राईम पोलीस निरीक्षक श्रीमती विजया पंधरे तसेच पोलीस कॉन्स्टेबल सुकेशनी चक्रनारायण या प्रामुख्याने विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्याकरिता उपस्थित होत्या. आजकाल समाजामध्ये वाढत चाललेले गुन्हे आणि महिला सुरक्षा संदर्भात एक मोठे प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. यासंदर्भात महिलांना पर्यायाने विद्यार्थिनींना सजग करण्यासाठी शाळा-शाळांमध्ये तसेच महाविद्यालयांमध्ये विद्यार्थिनींमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने पोलीस आयुक्तालयातर्फे जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. गुन्हा व गुन्हेगार ओळखणे हीच आपली सुरक्षा आहे तसेच सोशल मीडिया, मोबाईल या गोष्टींचा चुकीचा वापर करणे टाळणे आणि आपली व्यक्तिगत माहिती किंवा फोटो अपरिचित व्यक्तीला देणे टाळणे, अनोळखी व्यक्तीला ओटीपी न देणे, इत्यादी महत्त्वाच्या सूचना यावेळी विद्यार्थिनींना देण्यात आल्या. वेगवेगळी उदाहरणे तसेच खेळाच्या माध्यमातून आपली सुरक्षा आपल्या हातात आहे त्याचे महत्त्व विद्यार्थिनींना पोलीस आयुक्तांनी पटवून दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेच्या सहसचिव प्रा. ममता पांडे मॅडम, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते तसेच शिक्षक प्रतिनिधी प्रा. मंजिरी वळसे मॅडम आवर्जून उपस्थित होत्या. विद्यार्थिनींचा भरघोस प्रतिसाद या कार्यक्रमास मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे सचिव निनाद सोमण तसेच संपूर्ण कार्यकारणीचे मोलाचे सहकार्य यावेळी लाभले. याप्रसंगी प्रा. तीनखेडे, प्रा. पोकळे, प्रा. साबळे, प्रा. सोवळे, प्रा. व्यास, प्रा. गायकवाड, प्रा. डगवार, प्रा. विशाखा पांडे यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन प्रा.कांचन परतेकी यांनी केले.

# सोयाबीनवरील पिवळा मोझॅक रोगासाठी करा हे दहा सोपे उपाय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती.**सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक म्हणजेच




केवडा हा रोग 'मुंगबीन यलो मोझॅक' या विषाणूंमुळे होतो. कडधान्य आणि तणे ही या रोगाची पर्यायी यजमान पिके आहेत. या रोगामुळे सोयाबीनमध्ये १५ ते ७५ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते.

**रोगाची लक्षणे**

- सोयाबीनच्या पानाच्या मुख्य शिरीपाशी विखुरलेल्या अवस्थेत पिवळ्या रंगाचे चट्टे अथवा अनियमित पट्टे दिसतात.

- जसे पाने परिपक्व तसे त्यावर गंजलेले तांबूस रंगाचे चट्टे दिसतात.

- काही वेळा जास्त प्रादुर्भाव असल्यास पाने अरूंद होतात व मुरगळतात.लहान अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास पूर्ण झाड पिवळे पडते. अशा झाडांना कालांतराने फुले आणि शेंगा कमी लागतात किंवा त्यातील दाण्यांचा आकार लहान राहतो किंवा संपूर्ण शेंगा दाणे विरहीत राहून पोचट होतात आणि पर्यायाने उत्पन्नात मोठी घट येते. तसेच दाण्यांमधील तेलाचे प्रमाण घटते तर प्रथिनांच्या प्रमाणात वाढ होते.

**रोगाचा प्रसार**

पिवळा मोझॅक म्हणजेच केवडा रोगास कारणीभूत असलेला मुंगबीन यलो मोझॅक याचा विषाणू पानातील रसामार्फत पसरतो आणि हा प्रसार मुख्यत: पांढऱ्या माशी या रसशोषक किडीव्दारे केला जातो. त्यामुळे वेळीच या रोगाला ओळखून तसेच पांढऱ्या माशीचे नियंत्रण करून या रोगाचे व्यवस्थापन खालील प्रमाणे करावे.

**सोयाबीनवरील पांढरी माशी आणि पिवळ्या मोझॅक विषाणूचे एकात्मिक व्यवस्थापन**




१) रोगास बळी पडणाऱ्या वाणाची लागवड न करता आपल्या भागात विद्यापीठाव्दारे शिफारस केलेल्या सोयाबीन वाणांचीच लागवड करावी. लागवडीनंतर वेळोवेळी पिकाचे कीड व रोगांसाठी निरीक्षण आणि सर्वेक्षण करावे.

२) मोझॅक (केवडा) झालेली प्रादुर्भावग्रस्त पाने, झाडे दिसून येताच ती वेळोवेळी समूळ काढून नष्ट करावीत जेणेकरून निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल. कमीत कमी पहिले ४५ दिवस पीक तणमुक्त ठेवावे.

३) पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पिकामध्ये प्रति एकरी १० पिवळे चिकट सापळे लावावेत. पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी पिकावर रोगाची लक्षणे दिसताच किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लिर्कॅनिसिलियम लिर्कॅनी या जैविक बूरशीयुक्त कीटकनाशकाची ८०० ग्रॅमप्रती एकर या प्रमाणात हवेत आर्द्रता व जमिनीत ओल असताना फवारणी करावी.

५) रासायनिक कीटकनाशका मध्ये थायमिथोक्झाम १२.६% + लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६% झेडसी ५० मिली किंवा असटिामिप्रीड २५% + बाइफेन्थ्रीन २५% डब्लूजी १०० ग्रॅम किंवा बीटा साइफ्लुथ्रीन ८.४९% + इमिडाक्लोप्रीड १९.८१% ओडी १४० मिली यापैकी एका किटकनाशकाची फवारणी प्रति एकर याप्रमाणात करावी.

६) कीटकनाशकाची फवारणी करताना त्यामध्ये कुठलेही तणनाशक, बुरशीनाशक, संप्रेरक, खत अथवा इतर रसायने मिसळून नये, मिसळून फवारणी केल्यास किटकनाशकाचा अपेक्षित परिणाम न होता उलट पिकावर दुष्परिणाम होऊन पीक खराब होऊ शकते. नत्रयुक्त खताचा अतिरिक्त वापर टाळून शिफारसीनुसारच करावा. मूग, उडीद यासारखा पर्यायी खाद्य वनस्पतीवरून पिवळा मोझॅक रोगाचा प्रसार होण्यापासून रोखण्यासाठी अशा पिकावरील पांढरी माशीचे व्यवस्थापन करावे पावसाचा ताण पडल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे.


१०) बिगर हंगामी सोयाबीनची लागवड शक्यतो टाळावी जेणेकरून किडीच्या जीवनक्रमात खंड पडतो आणि पुढील हंगामात पर्यायाने किडींचा प्रादुर्भाव कमी राहतो. पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी आवश्यकता वाटल्यास दहा दिवसानंतर परत एकदा कीटकनाशकां ची फवारणी करावी.




# बदामच कशाला हवेत, 'या' ५ गोष्टी रोज पाण्यात भिजवून खा; बळकट हाडं - पोलादी होईल शरीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती. दि.७ -** पाण्यात भिजवलेले बदाम खाल्ल्याने शरीराला खूप ताकद मिळते (क्शरश्रींह ढळ्ीी). परंतु, नियमित बदाम खाणं होत नाही.



काहींना बदाम परवडते, तर काहींना बदाम खायला आवडत नाही. बदमामध्ये फायबर, व्हिटॅमिन ई, ओमेगा-३ फॅटी सिड, फॉस्फरस, प्रोटीन आणि इतर अनेक पोषक घटक असतात यामुळे मेंदू तीक्ष्ण, हृदयाचे आरोग्य निरोगी आणि वजन कमी करण्यासही मदत होते. पण जर आपल्याला नियमित बदाम खाणं होत नसेल तर, या ५ गोष्टी खा. यातून आपल्याला प्रोटीन, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी, फायबर आणि हेल्दी कार्ब्स मिळतील

**हिरवे मूग-** प्रोटीनचा उत्तम सोर्स म्हणजे हिरवे मूग. आपण हिरवे मूग रात्री पाण्यात भिजत घालून सकाळी खाऊ शकता. यूएसडीएच्या मते, मोड आलेले हिरवे मूग खाल्ल्याने शरीराला प्रोटीन, कार्ब्स, फोलेट, व्हिटॅमिन बी, आयर्न मिळते. यामुळे शरीरातील थकवा आणि आजारांचा धोकाही कमी होतो.

**शेंगदाणे-** शेंगदाण्याला गरीबांचा बदामही म्हणतात. शेंगदाणे स्वस्त असून, त्यातून शरीराला बदामाचे सर्व गुण मिळतात. त्यात प्रोटीन, फायबर, मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स, मॅग्नेशियम, कॅल्शियम, पोटॅशियम यांसारखे जवळजवळ सर्व पोषक घटक असतात. हे रात्रभर पाण्यात भिजत घालून सकाळी खाऊ शकता.

**चणे-** भाजलेले किंवा पाण्यात भिजलेले चणे खाण्याचे अनेक फायदे आहेत. आपण मोड आलेले चणेही खाऊ शकता. यामध्ये प्रोटीन, फायबर, आयर्न, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी आणि आरोग्यदायी कॅलरीज असतात. जे स्नायूंसह हाडे मजबूत करतात.

**अक्रोड-** बदामापेक्षा मेंदूच्या उत्तम आरोग्यासाठी अक्रोड फायदेशीर ठरते. त्यात हेल्दी फॅट्स आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात. ज्यामुळे मेंदूचे कार्य सुधारते. याशिवाय यात लोह, फॉस्फरस, तांबे, प्रथिने, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि सेलेनियम यांसारख्या पोषक तत्वांचा समावेश असतो. आपण रात्रभर पाण्यात अक्रोड भिजत घालून सकाळी खाऊ शकता.

**अंजीर-** अंजीर आपण पाण्यात भिजत घालून सकाळी खाऊ शकता. यातील फायबर बद्धकोष्ठता आणि पोटाचे विकार दूर ठेवण्यास मदत करतील. शिवाय अंजीरमधील पौष्टीक घटक शरीरातील स्टॅमिना वाढवण्यास मदत करतात.

# प्रल्हादराव पारीसे महाराज राज्यस्तरीय गुरुदेव जीवन गौरव पुरस्काराने सम्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७तिवसा.-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा विचाराने प्रेरित असलेले तिवसा तालुक्यातील गुरुकुंज आश्रम येथील ग्रामगीता आजीवन प्रचारक प्रल्हादाराव पारीसे महाराज यांना नुकतेच पंढरपूर येथे राज्यस्तरीय गुरुदेव जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पारिसे महाराज हे वयाच्या आठराव्या वर्षांपासून गुरुकुंज आश्रम येथे महाराजांचा सेवेत असून वं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा संपूर्ण वाङमयाचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत, त्यांनी आपल संपूर्ण आयुष्य महाराजांच्या सेवेत अर्पण केले असल्याने,.राष्ट्र संत तुकडोजी महाराजांची ५६



वी पुण्यतिथी व श्री गुरुदेव पंढरपूर यात्रा समितीद्वारे आयोजित पंढरपूर देवदर्शन यात्रेनिमित्त प्रल्हादराव पारीसे महाराज यांना राज्यस्तरीय गुरुदेव जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला.पद्मश्री फाउंडेशन नागपूर डॉ. संजय आदमने व साक्षी कथ्थक नृत्य अकादमी चॅरिटेबल फाउंडेशनचे वर्धा डॉ. किरण खडसे महाराष्ट्र भूषण तथा भारतीय ज्ञानपीठ पुरस्कृत अध्यक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने हा गौरव पुरस्कार देण्यात आला.

# बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप घ्या आता अनुदानावर कुठे कराल अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** - सन २०२४-२५ मध्ये योजनेंतर्गत चालू हंगामामध्ये 'बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपा'चा पुरवठा करण्याकरिता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जाद्वारे करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र शेतकऱ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर दि. १४ ऑगस्ट, २०२४ पर्यंत अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पद्धतीस चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे या उद्देशाने राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे.

शेतकऱ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या वेबसाईट वर जाऊन जास्तीत-जास्त ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी




विभागामार्फत करण्यात येत आहे.

**कसा कराल अर्ज**

१) अर्ज करणे साठी वेबसाईट https://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login

२) लाभार्थी (शेतकरी) युजर आयडी व पासवर्ड तयार करणे.

३) लाभार्थी (शेतकरी) युजर आयडी व पासवर्ड टाकून लॉगीन करणे.

४) अर्ज करा या बाबीवर क्लिक करणे.

५) कृषी यांत्रिकीकरण बाबीवर क्लिक करणे.

६) मुख्य घटक बाबीवर क्लिक करणे.

७) तपशील बाबीवर क्लिक करून - मनुष्यचलित औजारे घटक निवड - यंत्र/औजारे व उपकरणे - पिक संरक्षण औजारे - बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप (कापूस किंवा सोयाबीन) बाब निवडणे

अधिक माहितीसाठी नजीकच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी/उप विभागीय कृषी अधिकारी/तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ७ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण

# लाभार्थ्यांच्या अनुदान खात्यावर होल्ड लावणाऱ्या बँकेवर होणार कारवाई; जिल्हाधिकारी कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती,**

शासनाव्दारे विविध कल्याणकारी योजनेतंर्गत पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट अनुदान रक्कम जमा केली जातात. शासनाव्दारे दिल्या जाणाऱ्या अनुदानावर बँका होल्ड लावीत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहे. शासनाव्दारे प्राप्त अनुदान खात्यावर होल्ड न लावण्याचे शासनाने व रिझर्व्ह बँकेचे स्पष्ट निर्देश आहे. या निर्देशाचे पालन न करणारे तसेच लाभार्थ्यांची अडवणूक करणाऱ्या बँक शाखा व्यवस्थापकावर कडक कारवाई केल्या जाईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी संबंधित बँकाना दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे जिल्हयातील विविध बँकेच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा अग्रीम बँकेचे व्यवस्थापक श्यामकुमार शर्मा, विभागीय उपक्षेत्रीय प्रमुख सुनील दोहरे, झोनल व्यवस्थापक उमेशकुमार पराते तसेच विविध बँकेचे नोडल अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले की, शासनाव्दारे विविध योजनेतंर्गत लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा केल्या जातात. परंतु लाभार्थ्यांच्या खाते होल्ड करीत असल्याचे तक्रारी लोकप्रतिनिधी व नागरिकाव्दारे प्राप्त झाली आहे. शासनाव्दारे दिल्या जाणाऱ्या अनुदानावर बँकेने होल्ड लावणे बेकायदेशीर असून हे अंत्यत गंभीर बाब आहे. अशा खात्यांना होल्ड लावण्यात आल्या असल्यास ते तातडीने काढून टाकावे. खातेधारकांना व्यवहार करताना येणाऱ्या अडचणी संबंधित बँक शाखा व्यवस्थापकांनी आपल्या स्तरावरच निपटारा करावा. खाते होल्डच्या तक्रारी होणार नाही, याची दक्षता संबंधित बँकेनी घ्यावी. यासाठी संबंधित बँकेनी नोडल अधिकारीची नेमणूक करुन खातेधारकांच्या अडचणीचे समाधान करावे. तसेच पिक कर्जासाठी शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार कर्ज पुरवठा उपलब्ध करुन द्यावा. पिक कर्जाचे दिलेले उद्दिष्ट संबंधित बँकेने मुदतीत पूर्ण करावे, अशा सूचना कटियार यांनी यावेळी दिले.खातेधारकांना बँक व्यवहार करताना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी संबंधित बँकेने नोडल अधिकारी घोषीत केले असून त्यांचे संपर्क क्रमांक याप्रमाणे : बँक ऑफ बडोदाचे सुजित खैरे (९४०४७३२६००), बँक ऑफ इंडियाचे मनहवरलाल कानवर (८८७१४५८९०४), बँक ऑफ महाराष्टाचे अर्जन भौसारी (९०९६३१२१४२), कॅनरा बँकचे मनिष अंम्हे (९१७५२२१६०१), सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे प्रविण रामबाड (८६९२९६६६६७), इंडियन बँकचे चंदन गायधाने (९९७०९७०११०), इंडियन ओर्वसी बँकचे संदिप जालेबर (९५७२०५००६५), पंजाब नॅशनल बँकचे पंकज डावूलकर (९५०३६१४६५५), स्टेट बँक ऑफ इंडियाचे गौतम बोरकर (७४७०४३३३२२), युको बँकचे अतित्व झा (७३६६०६४२४६), यूनियन बँक ऑफ इंडियाचे प्रशांत काळे (९५५२७३३००३), एक्सेस बॅकचे वंदना देशपांडे (८६००९००३७६), एचडीएफसी बँकचे शैलेश डोंगरे (९६८९६२२७७६), आयसीआयसीआय बँकचे रोशन शेळके (९१६८६८४६४६), आयडीबीआय बँकचे संदिप माकोडे (९९२२२४०६९९), रत्नाकर बँकचे मोहम्मद ईशाद (९३७३४९६४७७), इंदूसिंद बँकचे श्याम जगताप (८९८३०८५३६९), व्हीकेजीबी बँकचे अंजिक्य कानजोडे (८२७५३९९२५४)

# ‘त्यांनी ब्लॅकमेल केले, पैशाची मागणी केली’

## आ.राणांचा अडसुळांवर पलटवार

## अडसूळ विरुद्ध राणा वाद पेटला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती:**

अमरावती लोकसभा मतदार संघातून नवनीत राणा यांचा पराभव झाला. मात्र त्या आधीपासूनच या मतदार संघात राणा विरूद्ध अडसूळ यांच्यात वाद होता. मात्र सर्व काही ठिक आहे असं वाटत असताना अमरावतीत गणित बिघडलं. नवनीत राणा यांना मोठ्या पराभवाला सामोरे जावं लागलं. या पराभवात शिवसेना शिंदे गटाचे नेते आनंदराव अडसूळ यांचा हात असल्याचा आरोप आता आमदार रवी राणा यांनी केली आहे. अडसूळ यांनी आपल्याला ब्लॅकमेल केले. जात पडताळणी प्रकरणात आपल्याकडे पैशांचीही मागणी केली. आता ते अमित शहा यांना ब्लॅकमेल करत आहेत असा गंभीर आरोप रवी राणा यांनी केला आहे. अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला राज्यपाल पदाचे आश्वासन दिले होते असा दावा आनंदराव अडसूळ यांनी केला आहे. त्या पार्श्व भूमिवर रवी राणा बोलत होते.आमदार रवी राणा यांनी आनंदराव अडसूळ यांच्या दाव्यानंतर त्यांच्यावर जोरदार टिका केली आहे. अडसूळ हे आपल्याला ब्लॅकमेल करत होते. शिवाय नवनीत राणांच्या जात प्रमाणपत्र प्रकरणात पैसेही मागत होते असा आरोप केला आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांनी नवनीत राणा यांचे काम करणार असल्याचा शब्द दिला होता. पण त्यांनी तो पाळला नाही. नवनीत राणा यांच्या पराभवासाठी त्यांनी संपूर्ण यंत्रणा राबवली.नवनीत राणा यांच्या पराभवात तेच कारणीभूत आहेत असा आरोपही त्यांनी केला.



### ‘अडसूळांना मानसिक उपचाराची गरज’

आनंदराव अडसूळ यांना आता मानसिक उपचाराची गरज आहे. ते आधी आम्हाल ब्लॅकमेल करत होते. ते आता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना ब्लॅकमेल करत आहेत. त्यांचे मानसिक संतूलन बिघडले आहे. त्यामुळे त्यांना मानसिक उपचाराची गरज आहे. त्यासाठी लागणारा सर्व खर्च आपण करण्यास तयार असल्याचेही ते म्हणाले. त्यांना सध्या आरामाची गरज आहे असेही ते म्हणाले.

# विदर्भात आयआयटी स्थापन करा: खा. बळवंत वानखडे

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या कडे केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

विदर्भात जागतिक दर्जाची उच्च शिक्षण आणि संशोधन संस्था उभारणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे अमरावतीमध्ये इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) स्थापन करण्याची मागणी अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली आहे.



अमरावती जिल्ह्यातील तसेच विदर्भातील उद्योजकता कौशल्यांना चालना देण्याकरिता उद्योग आणि शैक्षणिक संस्थांसोबत आपले - संशोधन आणि नवकल्पना वाढावे. तसचे - संशोधन, विकास आणि उद्योग एकाच - छताखाली आणण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. विदर्भातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी क्षमता आहे. तथापि, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या उच्च शिक्षणाच्या अभावामुळे, विदर्भातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि जागतिक परिस्थितीत नोकरीच्या संधी मिळवता येत नाहीत. विदर्भात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जागतिक दर्जाची शिक्षण आणि संशोधन संस्था स्थापन केल्याने तरुण विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान संशोधनाबाबतचा स्वभाव वाढेल. हे आंतर-विषय शिक्षण प्रदान करेल आणि मूलभूत विज्ञान आणि जागतिक दर्जाच्या

तंत्रज्ञानाच्या विकासासाठी सर्वोत्तम गुंतवण्याच्या संस्कृतीला चालना देईल. सर्व राज्यांमध्ये राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन केलेल्या आहेत. आयआयटी मुळे विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी नवीन मार्ग खुले होतील. त्यांना मूलभूत वैज्ञानिक संशोधन, तंत्रज्ञान विकासासाठी प्रेरणा मिळेल, अधिक रोजगार क्षमता निर्माण होईल. असेही चर्चे दरम्यान खासदार बळवंत वानखडे यांनी सांगितले. अमरावतीमधील आयआयटी स्थापन झाल्यास एक प्रतिभासंचय तयार करेल. ज्याचा देशाला फायदा होईल. उद्योग, स्टार्टअप आणि संशोधन संस्थांनाही आकर्षित करेल, ज्यामुळे भारताच्या विकासाला चालना देणारी एक दोलायमान परिसंस्था निर्माण होईल. असे केंद्रीय शिक्षण मंत्र्यांसोबत भेट घेऊन खासदार वानखडे यांनी चर्चा केली.

# आ.राणांचे विजय मिल ची जागा हडपण्याचे षडयंत्र

## नितीन कदम यांच्या राणांवर जोरदार प्रहार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती –** आमदार रवी राणा हे फिनले मिलच्या संदर्भात दुसऱ्यांच्या मतदारसंघात नाक खुपसत आहेत. त्यांनी स्वतः च्या बडनेरा मतदारसंघात काय दिवे लावले ते आधी सांगावे. पंधरा वर्षांपूर्वी सूतगिरणी विजय मिल सुरू करण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते, मात्र विजय मिल सुरू तर केलीच नाही उलट ती जागाच हडपण्याचा प्रकार आमदार रवी राणा यांनी केला आहे, असा आरोप संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी मंगळवारी पत्रपरिषदेत केला. आमदार राणा भूमाफिया असून भातकुली तालुका व बडनेरा मतदारसंघातील अनेक जागा ते आपल्या सहकाऱ्यांच्या नावे करतात. गोपालनगर येथील सूतगिरणी गेल्या अनेक वर्षांपासून बंद आहे. येथे काम करणाऱ्या ८०० लोकांना बेरोजगार होण्याचे कारण आमदार रवी राणा आहे. रवी राणा यांनी विकासाच्या नावावर मतदारसंघ भकास केला आहे. भातकुली पुनर्वसनची जागासुद्धा आमदार रवी राणा यांनी हडपली असून या ठिकाणी एमआयडीसीसाठी ६५ एकर जागा मंजूर करण्यात आली होती. मात्र या ठिकाणी सध्या परिस्थितीत २३ प्लॉट मंजूर करण्यात आले आहे. सध्या तिथे कुठल्याच प्रकारचा उद्योग अद्याप सुरू करण्यात आलेला नाही. आपल्या वैयक्तिक लाभासाठी विकासाचे आश्वासन देऊन आपले खिसे भरणे हे आमदार रवी राणा करीत आहेत. वैयक्तिक लाभासाठी त्यांनी भातुकली येथील क्रीडा संकुल स्वतःच्या लेआउटमध्ये टाकले आहे, असा आरोपही नितीन कदम यांनी केला.



भातकुली शहरातील बसस्थानक अद्यापही सुसज्ज झालेले नाही. भातकुली-खोलापूर, भातकुली-आष्टी, भातकुली-गणोरी, भातकुली-चेचरवाडी धामोरी बस सेवा गत पाच वर्षापासून बंद आहे. मात्र आमदार त्या सुरू करू शकले नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांची व नागरिकांची गैरसोय होत आहे. बडनेरा येथील मोदी हॉस्पिटल व भातकुली येथील रुग्णालयाचा विकास झालेला नाही. भातकुली बसशहर वाहतूक सुरू झालेली नाही. पोलीस स्टेशनची इमारत व कर्मचारी वसाहती झाल्या नाहीत असा ही आरोन कदम यांनी रवी राणा या च्यावर केला.

### आभार यात्रा ऐवजी विकास यात्रा काढा

राणा दाम्पत्यांनी मतदारांचे आभार व्यक्त करण्यासाठी आभारयात्रा काढली आहे. त्याऐवजी त्यांनी आपल्या मतदारसंघात विकास यात्रा काढावी व मतदारसंघात कुठला विकास केला ? कुठले उद्योग आणले ? हे सांगावे. राणा दाम्पत्याने केवळ आश्वासनांची खैरात वाटली. त्यांनी विकासाच्या हवेत गोष्टी करून केवळ फोटोशूट केल्याचा आरोप नितीन कदम यांनी केला.

# प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती येथे महिंद्रा प्राइड क्लासरूम च्या वतीने कार्यशाळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती–** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा. डॉ. सौ. पूनमताई चौधरी,पकंज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश हरकुट यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. याचाच भाग म्हणुनविद्यार्थी रोजगार कौशल्य वाढविण्यासाठी मोठया प्रमाणात कार्यक्रम घेण्यात येतात विद्यार्थ्यां चे रोजगार कौशल्य व जीवन कौशल्य महिंद्रा प्राइड क्लासरूम तर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होतेयावेळी कंपनी तर्फे मोनिका मुंदनाईक, जुईली पाटील ,दिव्या धाडवे यांनी प्रशिक्षक म्हणून काम पहिले यात मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला कार्यक्रमच्या यशस्वीते साठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ शशिकांत थोरात तसेच कार्यक्रम समन्व्य कप्रा लक्ष्मीकांत काळकोंडे व प्रा प्रियंका पाटील, प्रा अभिजित काळबांडे, प्रा विक्रम परिहार, प्रा अंकित काळे यांनी प्रयत्न केले



# अंध विद्यालयाच्या वर्धापन दिनी शहर पोलीस उपायुक्त गणेशजी शिंदे यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती–** नुकतेच डॉ.नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयाचा ५८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन अगदी सकाळपासून तर संध्याकाळपर्यंत संस्थेत करण्यात आले होते.

शहरातील डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयाचे प्राचार्य नवनाथ इंगोले हे डॉ. गोविंद कासट मित्रमंडळीच्या सहकार्याने विद्यालयात अनेकविध समाजसेवी व अभ्यासोपयोगी उपक्रम संस्थेत विद्यार्थ्यांकरिता राबवित असतात.

वर्धापन दिनाच्या या कार्यक्रमात विद्यालयातील जवळपास दीडशे अंध विद्यार्थ्यांकरिता कराओके गीत गायन मनोरंजनाचा कार्यक्रम अंध विद्यालय, सुप्रसिद्ध रघुवीर व संगीत साधना कराओके क्लबचे संचालक चंद्रकांत पोपट व डॉ. गोविंद कासट मित्रमंडळी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

आपल्या अत्यंत व्यस्ततेतून शहर पोलीस उपायुक्त श्री गणेशजी शिंदे यांनीही धावती भेट या मनोरंजनाच्या कार्यक्रमाला दिली होती. यावेळी अंध विद्यालय, संगीत साधना व मित्रमंडळीच्या वतीने श्री गणेशजी शिंदे यांचा पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन यथोचित सन्मान व सत्कार यावेळी करण्यात आला.

आपल्या मनोगतातून श्री शिंदे यांनी संगीत साधना कराओके क्लबचे मनःपूर्वक कौतुक केले. अंध विद्यार्थ्यांच्या मनोरंजनाकरिता तेही संस्थेच्या वर्धापन दिनी असा कार्यक्रम घेणे, त्या कार्यक्रमात समाजातील अनेक व्यक्तींचा सहभाग असणे,



स्वतः विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग यांना संधी उपलब्ध करून देणे, संगीत साधनाच्याही कलावंतांनी अशा या सामाजिक कार्यक्रमाला एवढा वेळ देणे खरोखरच या सर्व गोष्टी अतिशय कौतुकास्पद व स्तुत्य आहेत, मी अशा अनेक कार्यक्रमांना मनापासून हजेरी लावतो, तो मी माझ्या पदाचा, कार्याचा, खाकीचा सन्मान समजतो. अशा या प्रेरणादायी सामाजिक कार्यक्रमाला मला उपस्थित राहता आले व येथील निखळ मनोरंजनाचा आनंद घेता आला. याचे मला मनापासून समाधान वाटले. आमच्या पोलीस खात्यातीलही अनेक मंडळी आपली धावपळीची नोकरी करून त्यांचा गायनाचा छंद जोपासतात. ही खरोखरच खूप कौतुकास्पद गोष्ट आहे. मी गात नाही, परंतु गाणे ऐकायला मला नक्कीच आवडते. अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. गोविंद कासट, रघुवीर चे चंद्रकांत पोपट, प्राचार्य नवनाथ इंगोले, दिनेश मोदी ( अमेरिका) गणेशजी शिंदे, प्रवीणजी मालपाणी, धनंजय नाकील, कैलास तिवारी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्व. दौलतभाई देसाई मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक जीवन गोरे यांनी केले.

कराओके गीत गायनाच्या मनोरंजनाच्या या कार्यक्रमात कलाकारांनी एक से बढकर एक गीतांची प्रस्तुती देऊन उपस्थित विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. विद्यार्थ्यांना गाणे म्हणणारा दिसत नसला तरी, गाण्याचा ठेका व लय संगीत ऐकून विद्यार्थी आपला आनंद यावेळी व्यक्त करत होते.

# शिवसेनेच्या आंदोलनाने विद्यार्थ्यांना मिळाला न्याय

## अनेक विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण

### विद्यार्थ्यांनि व्यक्त केले प्रकाश मारोटकर यांचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नांदगाव खंडेश्वर** वर्ग अकरावीत विज्ञान शाखेत शेकडो विद्यार्थी प्रवेशा पासून वंचित असल्याने याची दखल घेऊन शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयात ठिय्या आंदोलन केले होते याची दखल घेऊन शिक्षण उपसंचालक कार्यालयाने अकरावीचा प्रवेशासाठी वाढीव कोठा मंजूर करण्यात आल्याने एकूण ८० विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली त्यामुळे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनि प्रकाश मारोटकर यांचा सत्कार करून सामूहिक आभार व्यक्त केले



नांदगांव तालुक्यात विज्ञान शाखेचे वर्ग अकरावीचे एकच अनुदानित महाविद्यालय असल्याने तालुक्यातील शेकडो विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशा करिता गर्दी करतात त्यामुळे स्थानिक महाविद्यालयात पूर्वी पासून शिक्षण घेतलेले शेकडो विद्यार्थी प्रवेशा पासून वंचित राहतात या वर्षी सुद्धा एक महिन्या पासून विद्यार्थी प्रवेशा साठी वन वन भटकत होते आणि शिक्षण विभागाने वाढीव विद्यार्थी प्रवेशाला मान्यता दिली नसल्याने विद्यार्थी विवंचनेत होते याची दखल घेऊन शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी विद्यार्थ्यांनसह शिक्षण उपसंचालक कार्यालयात ठिय्या आंदोलन केले दोन दिवसांत विद्यार्थ्यांच्या वाढीव प्रवेशास मान्यता द्यावी अशी मागणी केली होती तेव्हा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची जाणीव ठेऊन आकाराविचा वाढीव कोटा शिक्षण उपसंचालकांनी मंजूर केल्याने आज पर्यंत ८० विद्यार्थ्यांची विज्ञान शाखेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली वाढीव प्रवेशाला प्रकाश मारोटकर यांच्या आंदोलनाने वाढीव प्रवेशास मान्यता मिळाल्याने आमचे शैक्षणिक होणारे नुकसान टळले अशी प्रतिक्रिया व्यक्त करत विध्यार्थ्यांनी आभार व्यक्त केले

> डॉ भाऊसाहेब देशमुखांचा तालुका असतांना तालुक्यातील विध्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवेशासाठी संघर्ष करावा लागतो हि फार शोकांतिका असून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिल्याचा आनंद वाटतो– **प्रकाश मारोटकर**

# अमरावती विधानसभा मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी प्रसिध्द

## २० ऑगस्टपर्यंत आक्षेप नोंदवावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**, आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुक – २०२४ च्या अनुषंगाने दि. १ जुलै २०२४ या अहर्ता दिनांकावर आधारित प्रारुप मतदार यादी आज दि. ०६ ऑगस्ट रोजी ०३८– अमरावती विधानसभा मतदारसंघातील सर्व ३२२ मतदान केंद्र तसेच अमरावती महानगरपालिका, तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या मतदार यादीबाबत काही आक्षेप असल्यास दि. २० ऑगस्ट २०२४ पर्यंत नोंदवावा, असे आवाहन अमरावती विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी यांनी केले आहे.



सदरची प्रारुप मतदार यादी शासकीय कामाकाजाचे वेळेत ०३८– अमरावती विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयात अवलोकनाकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे. सर्व संबंधित मतदारांनी या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नावाबाबत किंवा कोणत्याही तपशिलाबाबत काही आक्षेप असल्यास दि. २० ऑगस्ट, २०२४ रोजी किंवा त्यापुर्वी मतदार नोंदणी अधिकारी, ०३८– अमरावती विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयास आक्षेप दाखल करता येतील. तसेच जर आपले नाव मतदार यादीमध्ये नसेल तर नाव समाविष्ट करण्याकरीता नमुना ६ तसेच नाव किंवा इतर तपशिलात दुरूस्ती करावयाची असल्यास नमुना–८ भरून व नाव वगळायचे असल्यास नमुना– ७ भरुन मतदार नोंदणी अंधिकारी, ०३८ – अमरावती विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयास दि. २० ऑगस्ट, २०२४ रोजी किंवा त्यापुर्वी सादर करावे.

अमरावती विधानसभा मतदारसंघाची दि. ०१ जुलै, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा सुधारीत कार्यक्रमानुसार सर्व मतदान केंद्रावर शनिवार दि. १० ऑगस्ट, २०२४, रविवार दि. ११ ऑगस्ट, २०२४, शनिवार दि. १७ ऑगस्ट व रविवार दि. १८ ऑगस्ट, २०२४ रोजी विशेष मतदार नोंदणी शिबीर राबविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ) यांचेकडे नविन मतदार नोंदणी, तपशिलात दुरुस्ती अथवा नाव वगळणी करता येईल.

# नांदगाव पेठ येथे मातीचे शिवलिंग बनविण्याची कार्यशाळा

## श्रीरामचंद्र संस्थानचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नांदगाव पेठ** सोमवार पासून श्रावणमासाला प्रारंभ झाला.या श्रावणमासात भाविक गण भगवान महादेव यांची आराधना करतात.

नव्या पिढीला सणांचे महत्व कळावे याकरिता श्रावणमासात ज्या शिवलिंगाचे महत्व असते ते शिवलिंग मातीपासून कसे बनवावे याबाबत स्थानिक श्रीरामचंद्र संस्थानच्या वतीने रविवार दि.१८ ऑगस्ट रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. धर्मशास्त्र, सण, उत्सव याबाबत धार्मिक जनजागृती करण्याचे कार्य येथील श्रीरामचंद्र संस्थान करत आहे. नव्या पिढीला याबाबत माहिती व्हावी, हिंदू सणांचे महत्व कळावे यासाठी श्रीरामचंद्र संस्थान सातत्याने प्रयत्नशील असते. सध्या श्रावणमासाचे पर्व सुरू असल्याने या काळात शिवलिंगाचे पूजन करण्यात येते.हे शिवलिंग मातीपासून कसे बनवायचे, पर्यावरण पूरक शिवलिंगाचे महत्व काय याबाबत संस्थानच्या वतीने कार्यशाळा अयोजित करण्यात आलेली असून नितीन कोळेश्वर हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.



रविवार दि.१८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले असून इच्छुक विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी आराध्य इंगळे, शिवम चारथळ, यशराज पांडेय,जयेश खंडारे यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन श्रीरामचंद्र संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# कर्तृत्वसंपन्न आठ महिलांची स्त्री शक्ती पुरस्कारासाठी निवड

## १० ऑगस्ट रोजी पुरस्कार वितरण सोहळा

### शिवसेना जिल्हा प्रमुख सुनील खराटे यांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती–** महिला सक्षमीकरणाच्या चळवळीला गती देण्याचे कर्तव्य पार पाडत सामाजिक, शैक्षणिक राजकीय, सांस्कृतिक ,वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात उत्स्फूर्तपणे कार्य करीत समाजापुढे आदर्श निर्माण करणाऱ्या कर्तृत्वसंपन्न आठ महिलांची निवड माँ साहेब स्वर्गीय मीनाताई ठाकरे स्मृती प्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

अमरावती शहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित समारंभात या आठ महिलांना सौ रश्मी उद्धव ठाकरे ,शिवसेना नेत्या सुषमाताई अंधारे, माजी पालकमंत्री आमदार यशोमतीताई ठाकूर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.




पुरस्कार निवड समितीने विविध क्षेत्रात कार्यरत महिलांच्या कामगिरीची दखल घेत या आठ कर्तृत्वसंपन्न महिलांची माँ साहेब स्वर्गीय मीनाताई ठाकरे स्मृती प्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या स्त्री शक्ती पुरस्कारासाठी निवड केली आहे. या पुरस्कारार्थीमध्ये जगप्रसिद्ध हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी चेंडके, शैक्षणिक क्षेत्रात प्रसिद्ध दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कीर्तीताई अर्जुन, प्रसिद्ध उद्योजिका व समाजसेविका उज्वलाताई हावरे, पीडित महिलांसाठी झटणाऱ्या समाजसेविका, लेखक व मुक्त पत्रकार रजियाताई सुलताना, वैद्यकीय क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रात कार्यरत डॉक्टर सौ रंजनाताई बनारसे, असंख्य निराधार वृद्धांचा सांभाळ करून त्यांचे पालकत्व स्वीकारणाऱ्या सुखशांती वृद्धाश्रमाच्या संचालिका श्रीमती सुमनताई रेखाते, महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मंदाकिनीताई निमकर आणि सामाजिक क्षेत्रात अग्रेसर दिशा संस्थेच्या संचालिका ऍड ज्योतीताई खांडपासोळे यांचा समावेश आहे.

### भव्य दिव्य होणार सोहळा – सुनील खराटे

माँ साहेब स्वर्गीय मीनाताई ठाकरे स्मृती प्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कार सोहळा भव्य दिव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला असून शाल, पुष्पगुच्छ,मानपत्र आणि आकर्षक मानचिन्ह देऊन कर्तृत्ववान महिलांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास नागरिकांनी तसेच शिवसैनिकांनी व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केले आहे.



# शेवती जहागीर येथील अंगणवाडीजवळ घाणीचे साम्राज्य

## गाजरगवताचा वेढा, चिमुकल्यांचे आरोग्य धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नांदगाव पेठ –** शेवती जहागीर ग्रामपंचायतने नागरिकांच्या समस्यांकडे पूर्णतः दुर्लक्ष केलेले आहे. नागरिकांना तुच्छ समजणाऱ्या सरपंचांनी विकासकामाकडे लक्ष न देता केवळ मनमानी कारभार सुरू केलेला आहे. प्रभागातील अंगणवाडी क्र.३२८ जवळ घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे तर गाजरगवताने अंगणवाडीला वेढल्यामुळे लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अंगणवाडी जवळील नाली तुंबलेली असून आजूबाजूला गाजर गवत वाढलेले आहे. दोन दिवसांपूर्वी या गवतातून विषारी साप निघाल्याने चिमुकल्यांच्या जीवाला सुद्धा धोका असल्याची तक्रार माजी उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते गजानन लुंगे यांनी केली आहे. अंगणवाडी येथे गावातील अनेक विद्यार्थी असून याठिकाणी सर्वत्र दुर्गंधी पसरलेली आहे. पावसाळ्यात तुंबलेल्या नाल्यांमुळे चिमुकल्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असून सरपंच यांनी दखल घेणे गरजेचे आहे. गजानन लुंगे यांनी याबाबत सरपंच यांना धारेवर धरले असून विद्यार्थ्यांच्या जीवाशी चाललेला हा पोरखेळ थांबविण्याची विनंती केली आहे. सरपंच यांनी विकासकामांकडे लक्ष न देता केवळ कमिशन आणि गावात खासगी टोल घेऊन पदाचा दुरुपयोग करत असल्याचा आरोप लुंगे यांनी केला आहे.तीन दिवसा जर अंगणवाडीचा परिसर निर्जंतुक आणि स्वच्छ करण्यात आला नाही तर आपण याबाबत वरिष्ठांकडे तक्रार करू असा इशारा गजानन लुंगे यांनी दिला आहे.



# सपन, चंद्रभागा धरणाचे दरवाजे उघडले

## नदीकाठच्या गावांना सर्तकतेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७चांदूरबाजार–** गेल्या पंधरा दिवसापासून सतत सुरू असलेल्या पावसामुळे अचलपूर तालुक्यातील महत्वाचे प्रकल्प असलेले सपन व चंद्रभागा मध्यम प्रकल्पामध्ये जलसाठा वाढल्याने मंगळवार ६ ऑगस्ट रोजी दोन्ही प्रकल्पाचे दरवाजे उघडण्यात आले. सपन मध्यम प्रकल्पाचे २ दरवाजे ५ सेंटीमीटरने तर चंद्रभागा मध्यम प्रकल्पाची ३ दरवाजे ५ सेंटीमीटरने उघडल्याने दोन्ही नदीकाठवरी नागरिकांना सर्तकतेचा इशारा देण्यात आला आहे. तालुक्यातील चंद्रभागा नदी व सापन नदीवरील या दोन्ही प्रकल्पाची ऑगस्ट महिन्याच्या अपेक्षित पाणीपातळी पर्यंत पोहचली आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने वझ्झर येथील सपन प्रकल्पाचे २ गेट दुपारी ३ वाजता ५ सेंटिमीटरने उघडले. या दरवाज्यांमधून प्रति सेकंद ६.७४ घनमिटर प्रतिसेकंदाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. जलाशयाची पातळी ५१०.८५० मीटर असून उपयुक्त जलसाठा ३१.१९ दशलक्ष घनमिटर आहे. धरणात एकूण ८०.८१ टक्के पाणी आहे. चंद्रभागा नदीवरील चंद्रभागा मध्यम प्रकल्पाची ३ गेट ५ सेंटीमीटरने दुपारी २ वाजच्या सुमारास उघडण्यात आली आहे. या प्रकल्पातून १५.९४ घनमीटर प्रतिसेकंदाने पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. सध्या जलाशयाची पातळी ५०४.९० मिटर असून उपयुक्त ६२.९७ दशलक्ष घनमिटर आहे. धरण ८८.८० टक्के जलसाठा आहे. परतवाडा व अचलपूर शहराला पाणीपुरवठा करणार्या जलाशयाची पाणी पातळी वाढल्याने जुळ्या शहराची भविष्यातील पाण्याची काळजी संपुष्टात आली आहे. सिंचनाचाही प्रशन तुर्तास मिटला असून अचलपूर शहरातून वाहणा सापन नदी काठावरील रहिवाशांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



# संत्रा फळावरील सबसिडी व्यापाऱ्यांच्या घशात !

## निर्यात सबसिडी प्रस्ताव संशयाच्या भोवऱ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ वरुड –** संत्रा उत्पादकांसाठी राज्य शासनाने मागितलेल्या निर्यात सबसिडी प्रस्तावापैकी जिल्ह्यातून स्थानिक केवळ चार कंपन्यांचे ११ तर कलकत्ता येथील १८ कंपन्यांचे २६ असे एकूण ३७ प्रस्ताव अमरावती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने पणन महासंघाकडे पाठविले होते. त्यातून पणन महासंघाने छाननी करून केवळ ९ प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविले आहेत. यातील कलकत्त्याचे किती आणि स्थानिक किती, याची माहिती उघड न झाल्यामुळे हे प्रस्तावच संशयाच्या भोवर्यात असल्याचा आरोप स्थानिक संत्रा उत्पादकांकडून होत आहे.

आयात शुल्कामुळे नागपुरी संत्र्याची बांगलादेशातील निर्यात मंदावली आणि देशांतर्गत बाजारातील संत्र्याचे दर कोसळल्याने संत्रा उत्पादकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. शेतकर्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने ७ डिसेंबर २०२३ रोजी बांगलादेशात निर्यात होणार्या संत्र्याला ५० टक्के म्हणजेच ४४ रुपये प्रति किलो सबसिडी जाहीर केली. ही सबसिडी देण्यासाठी १७१ कोटी रुपयांची तरतूद केल्याचे राज्य सरकारने जाहीर केले होते. ही सबसिडी पणन संचालनालयाच्या माध्यमातून संत्रा निर्यात करणारे शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी प्रक्रिया संस्था आणि निर्यातदार यांनाच देण्याचा निर्णय राज्य सरकारच्या पणन मंत्रालयाने घेतला. त्याअनुषंगाने पणन संचालनालयाने संत्रा उत्पादक जिल्ह्यांमधील जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून संत्रा निर्यातीचे प्रस्ताव ३१ मार्च २०२४ पर्यंत मागितले.

अमरावती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने पणन संचालनालय कार्यालयाला संत्रा निर्यातीचे एकूण ३७ प्रस्ताव पाठविले. हे प्रस्ताव एकूण २२ कंपन्यांचे आहेत. ही सबसिडी अंबिया बहाराच्या सन् २०२३ मधील हंगामासाठी देण्यात आली होती. हा हंगाम डिसेंबर २०२३ मध्येच संपला. प्रस्ताव मागविण्याची प्रक्रिया १८ जानेवारी २०२४ पासून सुरू करण्यात आली. निर्यातदारांना ३१ मार्च २०२४ पर्यंत संत्रा निर्यातीचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधकांच्या माध्यमातून पणन संचालनायला सादर करायचे होते. मात्र, पणन संचालनालयाने हे प्रस्ताव मे २०२४ पर्यंत स्वीकारले. पणन संचालनालयाने मार्च २०२४ मध्ये २४, एप्रिल मध्ये ७ आणि मे महिन्यात ६ प्रस्ताव स्वीकारले. पणन संचालनालयाने मे २०२४ पर्यंत प्राप्त झालेल्या अमरावती जिल्ह्यातील २२ कंपन्यांच्या ३७ प्रस्तावांची छाननी केली आणि यातील ९ प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविले.




हे नऊ प्रस्ताव नेमके कोणकोणत्या कंपन्यांचे आहेत आणि ते किती कोटी रुपयांचे आहेत, हे पणन मंत्रालयाने अद्याप स्पष्ट केले नाही.

विशेष म्हणजे, राज्य सरकारने या प्रस्तावांना अद्याप मंजुरी दिली नसल्याने कुणालाही संत्रा निर्यात सबसिडी मिळाली नाही. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने ज्या २२ कंपन्यांचे ३७ प्रस्ताव पणन संचालनालयाला पाठविले, यात जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील चार कंपन्यांचे ११ तर पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील १८ कंपन्यांचे२६ प्रस्ताव होते. संत्रा निर्यात सबसिडी प्रस्ताव पाठविणारा अमरावती जिल्हा आणि वरुड तालुका एकमेव ठरला आहे. हा प्रकार देखील सबसिडी व सरकारच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.

# पाणी पुनर्भरणाचा नवा अध्याय; डॉ. सचिन पावडे यांच्या उपकरणास आंतरराष्ट्रीय पेटंट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ वर्धा**

भूगर्भातील जलपातळी खोलवर जाण्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे पुनर्भरण होण्यासाठी वैद्यकीय मंचचे डॉ.सचिन पावडे यांनी शोधलेल्या उपकरणास आंतरराष्ट्रीय पेटंट प्राप्त झाले आहे.



भूगर्भातून पाण्याचा बेसुमार उपसार होत आहे. मात्र त्या तुलनेत पाण्याचे पुनर्भरण होत नाही. त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने भविष्यात महाजलसंकट उद्भवू शकते. हे हेरून डॉ.सचिन पावडे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह या विषयी अभ्यास केला. त्या संशोधनातून 'भूजल मॉइस्ट सॉईल' हे उपकरण तयार केले. प्रथम स्वतः च्या घरात ही यंत्रणा लावली. ती यशस्वी असल्याचे दिसून आल्यावर या यंत्रणेचा लोकांना उपयोग व्हावा म्हणून प्रचार सुरू केला. या उपकरणात गुरुत्वाकर्षण शक्तीचा उपयोग आला आहे. त्यात तीन फिल्टर लावले आहे. परिणामी पावसाच्या पाण्याचे तीनदा शुद्धीकरण झाल्यानंतरच ते भूगर्भात जाते. या यंत्रणेचे त्यांनी देशभरात दोन हजार उपकरणे स्वस्त किंमतीत पाठविली.उपकरणामुळे विहिर व कुपनलिकेला भरपूर जलसाठा मिळाल्याची प्रतिक्रिया असल्याचे डॉ. पावडे सांगतात. मात्र हे यश पाहून काही व्यावसायिकांनी या उपकरणाची नक्कल बाजारात आणली. असे हे नकली उपकरण १५ ते २० हजार रूपये किंमतीत बाजारात विकल्या जात असल्याचे दिसून आले. ना नफा, ना तोटा या


Bundesrepublik Deutschland

Patent Urkunde

über die Eintragung des Gebrauchsmusters Nr. 20 2024 103 324

Bezeichnung: Regenwassernutzungsanlage mit integriertem Filter-Abscheidergerät

IPC: E03B 3/02

Inhaber/Inhaberin: Pawade, Sachin, Dr., Wardha, Maharashtra, IN

Tag der Anmeldung: 19.06.2024

Tag der Eintragung: 23.07.2024

Die Präsidentin des Deutschen Patent- und Markenamts

Eva Schewior


München, 23.07.2024

तत्वावर बनविलेल्या उपकरणाचा धंदेवाईक उपयोग होत असल्याचे पाहून डॉ.पावडे यांनी उपकरणाचे पेटंट घेण्याचा निर्णय घेतला. त्याला पावती मिळाली आहे. या भूजल मॉइस्ट सॉईल उपकरणास फेडरल रिपब्लीक ऑफ जर्मनीचे आंतरराष्ट्रीय पेटंट प्राप्त झाले आहे. तसेच भारत सरकारच्या पेटंट कार्यालयातर्फेही राष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. आपल्याकडे पारंपारिक पद्धतीने शोष खड्ड्यांच्या माध्यमातून पावसाचे पाणी आणि सांडपाणी जमिनीत मुरविण्याचा प्रयत्न केल्या जातो. मात्र या माध्यमातून पाणी खोलवर जाण्यास खूप विलंब लागतो. भूगर्भातील जलपातळी खोलवर जाण्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे पुनर्भरण होण्यासाठी वैद्यकीय मंचचे डॉ.सचिन पावडे यांनी शोधलेल्या उपकरणास आंतरराष्ट्रीय पेटंट प्राप्त झाले आहे. त्यातून भूगर्भाची जलपातळी प्रचंड खाली गेल्याचे स्पष्ट होते. अश्या स्थितीत पाण्याचे थेट पुनर्भरण होण्यासाठी विशिष्ट उपकरणाचीच गरज होती. ती डॉ.पावडे यांनी पूर्ण केली असून त्यावर आंतरराष्ट्रीय मोहोर उमटली आहे. आता हे उपकरण लोकांना माफकदरात उपलब्ध होईल. पर्यावरण पूरक कार्याबद्दल डॉ. सचिन पावडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# कोल्हापुरी चप्पलची नवी ३० डिझाईन्स लवकरच बाजारात येणार

## शासनाच्या कंपनीकडून ३०० महिलांना कागल येथे प्रशिक्षण सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७कोल्हापूर :६**



जगप्रसिद्ध कोल्हापुरी चप्पलची नवी ३० डिझाइन्स आता लवकरच बाजारात येणार आहेत. केंद्र सरकारच्या साडेतीन कोटी रुपयांच्या निधीतून सुरू करण्यात आलेल्या कोल्हापुरी लेदर न्ड चप्पल वर्क्स प्रोड्युसर कंपनीच्या वतीने यासाठी सध्या ३० महिलांना प्रशिक्षण देण्याचे काम कागल येथे सुरू आहे. राज्यातील अशा प्रकारची स्थापन करण्यात आलेली महिलांची पहिली कंपनी आहे.

केंद्र सरकारच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने इन्टरप्रेनरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या वतीने अशा प्रकारे प्रशिक्षण देणारी ही कंपनी गतवर्षी स्थापन करण्यात आली. त्याचा निधीही जमा झाला असून कागल येथील महिला बचतगटाच्या विक्री केंद्राच्या इमारतीत सध्या प्रशिक्षण सुरू आहे. महाराष्ट्र शासनाच्या जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. आणि ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक सुषमा देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी हे प्रशिक्षण सुरू आहे.

सकाळी ११ वाजता पहिल्या तुकडीतील ३० महिला प्रशिक्षणासाठी येतात. संध्याकाळी ११ वाजेपर्यंत त्यांना चप्पल तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येते. यासाठी दिल्लीहून ब्रिजेश जयस्वाल आणि कोल्हापूर जिल्ह्यातील दत्तात्रय सातपुते प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. या तुकडीला एक महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येत असून ते २७ जुलैपासून सुरू झाले आहे. या महिला नंतर याच पद्धतीने अन्य महिलांना प्रशिक्षित करणार असून यातून कौशल्यपूर्ण कारागिरांची संख्या वाढविण्यात येणार आहे.

### महिन्यात १५ हजार चप्पल निर्मितीचे उद्दिष्ट

या कंपनीच्या वतीने कोल्हापुरी चप्पलमध्ये नवी डिझाइन आणून अशा पद्धतीची १५ हजार चप्पल महिन्याभरात तयार करण्याचे उद्दिष्ट कंपनीने ठेवले आहे. यासाठीचा कच्चा माल, प्रशिक्षणासाठीचा खर्च केंद्र सरकारच्या निधीतून सुरू असून हे कौशल्यपूर्ण काम करताना महिलांमध्ये आत्मविश्वास आल्याचे जाणवल्याचे अध्यक्ष वैशाली गवळी यांनी सांगितले.

# अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेस राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**





राज्यातील मुस्लिम तसेच अल्पसंख्याक बांधवांच्या विकास योजनांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजितदादा पवार सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्याच प्रयत्न व पाठपुराव्यामुळे सरकारने अल्पसंख्याक आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला असून त्याची कार्यवाही सध्या अंतिम टप्प्यात आहे. अल्पसंख्याक समुदायासाठी 'टार्टी', 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय' स्थापन करण्याचा निर्णय विचाराधीन होता. आज बुधवार दिनांक ७ ऑगस्ट रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. या प्रयत्नांमुळे राज्यातील अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या प्रयत्नांना वेग येणार असल्याने अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्यासह राज्यातील अल्पसंख्यांक बांधवांच्या संस्था, संघटनांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अभिनंदन केले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरिता कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू करण्याची घोषणाही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तत्पूर्वी, यावर्षी, ११ मार्च रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्यांक आयुक्तालय तसेच जिल्हास्तरावर अल्पसंख्याक कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था' 'एमआरटीआय' स्थापन करण्याचा निर्णयही त्यांच्याच पुढाकाराने घेण्यात आला आहे.अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी एकूण ११ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संस्थेच्या आस्थापनेवरील पदांचे वेतन, कार्यालयीन खर्च, मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी, प्रशिक्षणासाठी एकूण ६ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.


या प्रयत्नांमुळे राज्यातील अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या प्रयत्नांना वेग येणार असल्याने अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. अजितदादा पवार यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

# शिकवायचं कधी?; अभियान, उत्सवातच शिक्षक गुंतले

## ऑगस्टमध्येच दोन अभियाने, एका उत्सवाची धांदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

कुणीही उठावं आणि कोणतंही अभियान, उत्सव सुरू करावा आणि त्यासाठी शाळा, शिक्षकांना वेठीस धरावं, अशी स्थिती राज्यात निर्माण झाली आहे. सध्या राज्यातील शाळांमध्ये दोन अभियाने आणि एक उत्सव सुरू आहे. त्यामुळे ऑगस्ट अखेरीपर्यंत शिकवण्यापेक्षा यातील उपक्रम आणि कार्यक्रम राबवण्यातच शिक्षकांची ताकद खर्ची पडणार आहे. विधानसभा आचारसंहितेनंतरच हे सर्व काही थंड होण्याची शक्यता आहे.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियानाचा दुसरा टप्पा २९ जुलैपासून सुरू होऊन तो ४ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. ५ सप्टेंबरपासून या स्पर्धेसाठीचे मूल्यांकन होणार असून यासाठी तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर मोठी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. यामध्ये सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांना सहभागी करून घेण्यासाठी प्रशासन धावपळीत आहे. अशातच नेहमीच्या उपक्रमांपेक्षा वेगळे उपक्रम राबवयाचे असल्याने शिक्षक आता याच कामात गुंतले आहेत.

याच पद्धतीने २२ जुलैपासून सर्व शाळांमध्ये 'महावाचन उत्सव' आयोजित करण्यात आला आहे. हा उत्सव ३० ऑगस्टपर्यंत चालणार आहे. या काळात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी, दर्जेदार साहित्यिक आणि लेखक यांची भेट होऊन त्यांचा परिचय करून देण्यासाठीचे उपक्रम आयोजित करण्याच्या सूचना आहेत. त्यामुळे सध्या शिक्षकवर्ग साहित्यिक, लेखक, कवी, पत्रकार यांना साहित्यविषयक उपक्रमांसाठीच्या निमंत्रणाच्या आणि नियोजनाच्या गडबडीत आहेत.

याचवेळी १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियान राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये पहिल्या २० दिवसांत अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी द्यायच्या आहेत. त्यानंतर सहा दिवसांत या शाळेतील त्रुटी दूर करून, सुधारणा करून घ्यावयाच्या आहेत. त्यानंतरच्या चार दिवसांत या सुधारणा झाल्याची, त्रुटी दूर झाल्याची खात्री करून घ्यायची आहे. आठवड्यातील सोमवार आणि शुक्रवारी दोनच दिवस कार्यालयात थांबून उर्वरित तीन-चार दिवस शाळांना भेटी देण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना असल्याने आता शाळाशाळांमध्ये अधिकाऱ्यांना फार त्रुटी दिसू नयेत, यासाठीही धावपळ सुरू आहे.

**आचारसंहितेच्या आधीची धावपळ**

सप्टेंबरमध्ये विधानसभेची आचारसंहिता लागणार असल्याने त्याआधीच हे सर्व उपक्रम संपवण्याची घाई सुरू आहे. एकीकडे महापुरासारखी परिस्थिती अनेक ठिकाणी निर्माण झाली असताना, शाळांना सुट्या देण्याची वेळ आली असताना दुसरीकडे हे अभियान, उत्सव करणे आणि त्याचे फोटो अपलोड करण्यातच शिक्षकांची ताकद जात आहे.



# राज्यातील पाच उपजिल्हाधिकाऱ्यांच्या बदल्या

## उपजिल्हाधिकारी अनिल भटकरांची यवतमाळला बदली : उदयसिंह भोसले अमरावतीचे नवे उपविभागीय अधिकारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनिमय आणि प्रशासकीय कारणास्तव सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने राज्यातील पाच उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अमरावतीचे यामध्ये कर्तव्यदक्ष उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांची बदली म यवतमाळ येथे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यवतमाळ या रिक्त पदावर झाली अ आहे. त्यांच्या जागी धाराशिवयेथील उदयसिंह भोसलेंचीबदली झाली आहे. राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने मंगळवार ६ ऑगस्ट रोजी हे आदेश काढले आहे. उपजिल्हाधिकारी धारावी पुनर्विकास प्रकल्प विनय गोसावी यांची बदली जळगाव येथे उपविभागीय अधिकारी म्हणून झाली आहे. धाराशिव येथील भूसंपादन अधिकारी उदयसिंह भोसले यांची अमरावती येथे उपविभागीय अधिकारी म्हणून बदली झाली आहे. नागपूरचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्रीराम मुंडा यांची बदली नागपूर मनपा उपायुक्त पदावर झाली. नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या गणेश राठोड यांची बदली प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी अहमदनगर/नाशिक या पदावर प्रतिनियुक्तीने झाली आहे.

# पीओपी मूर्तीबाबत उच्च न्यायालयात याचिका, बंदीबाबत राज्य शासनाकडून दिखावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राज्य शासनाकडून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या बंदीबाबत केवळ दिखावा केला जात असून, कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. परिणामी पर्यावरणप्रेमी गणेशमूर्तिकार देशोधडीला लागले आहेत. याप्रकरणी राज्यासह सातारा जिल्ह्यातील मूर्तिकारांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे,

महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा करण्याच्या पद्धतींमध्ये काही विकृती निर्माण झाल्या आहेत. याची सुरुवात गणेशमूर्तींच्या निर्मितीपासून होते. केंद्रीय प्रदूषण नियामक मंडळाने १२ मे २०२० पासून देशभरात प्रदूषणकारी प्लास्टर ऑफ पॅरिसपासून मूर्तींचे उत्पादन, साठवणूक, विक्री, आयात बंदी घातलेली आहे. सर्वोच्च न्यायालयानेही २०२१ साली ही बंदी कायम केली असताना, आजही बाजारात विक्रीस उपलब्ध असणाऱ्या ९० टक्के मूर्ती या प्लास्टर ऑफ पॅरिस निर्मित आहेत. पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्तींबाबत गेली दोन दशके



पर्यावरण संस्था सातत्याने समाज प्रबोधन करत आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणजे आज ग्राहक सजग झाला असून, मातीच्या मूर्तींबाबत आग्रही आहे; परंतु बाजारात गेल्यावर ग्राहकाकडे प्लास्टर ऑफ पॅरिसचाच पर्याय उपलब्ध आहे.

दरवर्षी गणेशोत्सव जवळ येताच राज्य सरकार पीओपी बंदीबाबत केवळ दिखावा करत असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जात नाही. राज्य सरकारच्या उदासीनतेमुळे आज पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती बनविणारे पारंपरिक मूर्तिकार देशोधडीला लागले असून, जलीय जैवविविधता प्रचंड वेगाने उद्ध्वस्त होते आहे. या सर्व मुद्द्यांबाबत राज्यातील विविध जिल्ह्यांतील पर्यावरण कार्यकर्ते व पारंपरिक मूर्तिकारांनी एकत्र येत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या बंदीची तंतोतंत अंमलबजावणी करणे, नियम मोडणाऱ्या मूर्तिकार, विक्रेते यांच्यावर अजामीनपात्र गुन्हे दाखल करणे, जिल्हास्तरीय समित्या नेमून त्यांच्यामार्फत अंमलबजावणीची देखरेख ठेवणे अशा प्रमुख मागण्या या याचिकेत केल्या आहेत. दि. ३१ जुलै रोजी याचिकेची प्रथम सुनावणी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय यांच्यासमोर झाली असून, याचिकाकर्त्यांचे म्हणणे गांभीर्यपूर्वक ऐकून सर्व प्रतिवादींना त्यांचे म्हणणे तीन आठवड्यांत सादर करण्याचे आदेश दिले आहेत,

# अमरावतीत राणा विरोधात शिवसेना (शिंदे) गट आक्रमक

## आ. रवी राणांच्या पोस्टरला चप्पल जोड्यांनी मारून केला निषेध




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

माजी खा. आनंदराव अडसूळ यांची मानसिक स्थिती बिघडली असून ते ब्लॅकमेल करीत असल्याचे वक्तव्य आ. रवी राणा यांनी नुकतेच केले होते. आ. रवी राणा यांनी केलेल्या या वक्तव्या विरोधात आज शिवसेना (शिंदे) आक्रमक झाली असून आज स्थानिक राजकमल चौकात शिवसैनिकांनी एकत्र येत आ. रवी राणा विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत व आ. रवी राणा यांच्या पोस्टारला चप्पल जोडे मारीत आ. रवी राणा यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध केला. राणा दाम्पत्याने आमच्या नेत्या विषयी बेताल वक्तव्य करू नये अन्यथा जशास तसे उत्तर देऊ असा इशारा यावेळी शिवसैनिकांनी दिला. येत्या काळात अमरावतीत महायुतीत वाद पेटण्याची शक्यता आहे.

भारतीय जनता पक्षाने राज्यपाल पदाचे आश्वासने दिले होते, मात्र ते पाळले नसल्याचाही आरोप अडसूळ यांनी मंगळवारी केलाअडसूळ यांनी आताआक्रमक भूमिका घेत आठ दिवस वाट पाहू असे जाहीर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने नवनीत राणा यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबद्दल जो निर्णय दिला होता तो अयोग्य होता, असा अडसूळ यांचा आरोप आहे. त्यामुळे नवनीत राणा यांना दिलेल्या जातवैधता प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालया याचिका दाखल करणार असा इशाराही माजी मंत्री आनंदराव अडसूळ यांनी दिला त्या इशाऱ्यावर आ राणा यांनी जोरदार पलटवार करीत आनंदराव अडसूळ यांना आता मानसिक उपचाराची गरज आहे. ते आधी आम्हाल ब्लॅकमेल करत होते. ते आता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना ब्लॅकमेल करत आहेत. त्यांचे मानसिक संतूलन बिघडले आहे. त्यामुळे त्यांना मानसिक उपचाराची गरज आहे. त्यासाठी लागणारा सर्व खर्च आपण करण्यास तयार असल्याचेही ते म्हणाले.त्यावर आता अमरावती मध्ये शिंदे गट व आ. राणा यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेत रस्त्यावर उतरला आहे

# आमदार बच्चु कडूंच्या विरोधात भाजपा सह हिंदु संघटना आक्रमक

## अचलपूर तहसील कार्यालयात धडक कार्यवाही करण्याची मागणी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अचलपुर**

आमदार बच्चु कडू यांच्या विरोधात आता हिंदु संघटनांन सह भारतीय जनता पार्टी आक्रमक झाली असून बुधवारी ७ ऑगस्ट रोजी अचलपूर तहसील कार्यालयामध्ये भाजपा व हिंदु संघटनांनी धडक देऊन आमदार बच्चु कडू यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व त्यांनी माफी मागावी अशी मागणी यावेळी अचलपूर तहसीलदार यांना निवेदन देऊन करण्यात आलीदिनांक ५ ऑगस्ट २०२४ रोजी हिंगोली येथे कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांचे नाव न घेता टीका केली टिका करतांना आमदार कडू यांची जीभ घसरल्याचं दिसून आलं घेतली कावड की निघाला महादेवाला अरे महादेव त्रिशुळ घालील की ढुंगणात असे म्हणत बच्चू कडू यांनी असंख्य महादेव भक्तांच्या भावन्या दुखावल्या यासह वास्तविक पाहता राजकीय किती की वितृष्ठ असलं तरी धार्मीक भावने बद्दल बोलण्याचे कोणतेही कारण बच्चु कडू यांना नव्हते आणि बच्चु कडू मध्ये तेवढीच मर्दानकी आहे तर दुसऱ्या धर्माच्या देवाचे नाव घेऊन अशा पध्दतीचे वक्तव्य करून दाखवावे असे खोचक वक्तव्य यावेळी भजपा ने केले वैयक्तिक राजकीय स्वार्थासाठी स्वतः हिंदु असतांना आपल्या विरोधकाच्या धार्मिक ठेच पोहोचवण्याचे काम आमदार कडू करत आहात याची किंमत नक्की चुकवावी लागेल असा इशारा यावेळी भाजपा पदधिकऱ्यांनी व हिंदु संघटनेन दिला बच्चु कडु यांनी केलेल्या वक्तव्याचा भारतीय जनता पार्टी व हिंदु संघटनेच्या वतीने निषेद करण्यात आला आणि आमदार कडु यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी व कडूंनी माफी मागावी अशी मागणी यावेळी अचलपूर तहसीलदार यांना निवेदनातून केली यावेळी भारतीय जनता पार्टी अमरावती जिल्हा ग्रामीणचे कार्यकारणी सदस्य अभय माथने पंचायत राज व ग्रामविकास संयोजक गोपाल तिरमारे डॉक्टर राजेश उभाळ आसरकर सर सुमित निंभोरकर,धर्मराज राऊत, छोटू लाडले,राजन जयस्वाल,विजय मिश्रा, पंडित, गजानन शर्मा, तेजस आजनकर, नंदू राऊत,अरुण निराटकर, संजय सावरकर, विकी सावरकर,मनोज ठाकूर, गणेश समशेर, अनिल बर्वे,वैभव यावल,सारंग नाईक, मंगेश आवणकर,आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### बांगलादेश मध्ये झालेल्या हिंदूंच्या अत्याचारावर कायदा तयार करा!

बांगलादेश येथे झालेल्या हिंसाचारात हिंदूवर झालेल्या अन्याय विरोधात व इजराइल देशाच्या धरतीवर भारतात सुद्धा भारताबाहेर राहणाऱ्या हिंदु वर जर अन्याय झाला तो भारतावर अन्याय होईल व भारत त्याच्या विरोधात कारवाई करेल अशा पद्धतीचा कायदा करण्यात यावा अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली.

# ...तर अनियमिततेसह पैसे उकळणाऱ्या 'आपले सरकार' केंद्रांना लागणार टाळे




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

सर्वसामान्य नागरिकांना विविध दाखल्यांसाठी गावागावांत उघडलेले आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये दाखल्यांसाठी जादा पैशांसोबत अनियमितता असल्यास केंद्रांना टाळे लागण्याची वेळ येऊ शकते.

आपले सरकार सेवा केंद्रातून कोणत्या दाखल्याला किती शुल्काची आकारणी करावी, याचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे. या आशयाचे दरफलक दर्शनी भागात लावावा, यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांद्वारा वेळोवेळी सूचना देण्यात आल्या. तरीही जास्त शुल्काची आकारणीशिवाय सेवेत दिरंगाई असे प्रकार होत असल्यास सुजाण नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार दाखल करावी. तक्रार केल्यानंतर अशा केंद्रांचा परवाना रद्द करण्यात येईल, असे महाआयटीने स्पष्ट केले आहे. आपले सरकार सेवा केंद्रामधून विविध प्रकारचे ४२ दाखले व प्रमाणपत्र कालावधी व आकारणी करावयाचे तसेच झेरॉक्स व कलर प्रिंट आउट देण्यात येतात.

### आयडीचा दूरुपयोग टाळा ठरवून

महाआयटीने ग्रामपंचायत स्तरावर महा ऑनलाईन केंद्र दिले आहे. याचा दुरुपयोग होत असल्याचेही दिसून आले आहे. परिणामी काही ग्रामपंचायतीमध्ये पदाधिकाऱ्यांनी मर्जितल्या लोकांना आयडीचा उपयोग करण्यासाठी दिला आहे. त्यांनी आपली दुकानदारी थाटली आहे. याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

# अडीच लाख उत्पन्न असेल तर मोफत तीर्थदर्शनाचा विसरा लाभ

## जेष्ठ नागरिकांसाठी योजना ३१ ऑगस्टपर्यंत करा अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राज्यातील सर्व धर्मीयांमधील ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना देशभरातील प्रमुख तीर्थक्षेत्रांची मोफत यात्रा करण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना आणली आहे. उत्पन्न अडीच लाखांहून अधिक असेल किंवा गंभीर आजार असेल तर या योजनेचा लाभ मिळणार नाही. प्रतिव्यक्ती प्रवास खर्चासाठी ३० हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळणार असून ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करायचे आहेत.

राज्यामधील ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र व देशातील प्रमुख तीर्थस्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेसाठी या योजनेचा एकवेळ लाभ घेता येईल. ३ प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रति व्यक्ती ३० हजार रुपये असून त्यात प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इत्यादी सर्व बाबींचा समावेश आहे.



**लॉटरीत नावे आले तरच लाभ**

जिल्हास्तरीय समिती लाभार्थ्यांची निवड करेल. अर्जदारांच्या संख्येसह त्या जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अधिभार देऊन कोटा निश्चित केला जाईल. विहित कोट्यापेक्षा जास्त अर्जाच्या उपलब्धतेवर आधारित संगणीकृत लॉटरीद्वारे लाभार्थी निवड केली जाईल.

**कोणाला लाभ मिळणार?**

महाराष्ट्राचे रहिवासी असलेले ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिक या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अर्ज करू शकतात. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम अडीच लाखांपेक्षा जास्त नसावे. अर्जासोबत ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आतील हवे)

**असा करा अर्ज**

ज्येष्ठ नागरिकांना योजनेसाठीच्या पोर्टल, मोबाइल ॲप किंवा सेतू सुविधा केंद्राद्वारे ऑनलाइन अर्ज करता येईल. अर्जासोबत लाभार्थ्यांचे आधार कार्ड, रेशन कार्ड, महाराष्ट्रराज्याचे अधिवास प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभाध्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र, प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल), सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंबप्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला व हमीपत्र आवश्यक राहील.

# आता, झाड तोडाल तर ५० हजार दंड, वन विभागाचा जीआर निघणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ मुंबई**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. त्यामध्ये, १२ विविध निर्णय घेण्यात आले असून जलसंपदा विभाग,



शेतकरी, आदिवासी आणि वन विभागासाठी महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले आहेत. त्यानुसार, यापुढे झाड तोडल्यास ५० हजार रुपयांच दंड आकारण्यात येणार आहे. यापूर्वी १ हजार रुपयांचा दंड आकारला जात होता. त्यामुळे, यापुढे झाडांची कत्तल करताना किंवा झाडे तोडताना होणाऱ्या परिणामाचा विचार करुनच पाऊल उचलायला हवं. विना परवानगी जंगल तोडणाऱ्यांसाठी वन विभागाच हे मोठ पाऊल उचललं आहे.

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत आज काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, वन विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून एक झाड तोडल्यास ५० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. या दंडाची तरतूद करणारा शासन निर्णय लवकरच पारीत होईल. तसेच, पुढील आठवड्यात १५ ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्य दिवस असल्याने हर घर तिरंगा मोहिम राबविण्यात येणार आहे. त्यासाठीही, विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला आहे. ९ ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबवविणार येणार असून अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकविण्यात येईल.


# शेतकरी व सर्वसामान्यांच्या हक्कासाठी काँग्रेसची जिल्हा कचेरीवर उद्या निदर्शने

## इर्विन चौकातून निघणार मोर्चा , पदाधिकारी व काँग्रेस कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती**

भारतीय राज्यघटनेत शेतकरी अत्यंत महत्त्वाचा घटक असताना देखील शेतकऱ्यांच्या मागणीकडे केंद्र व राज्य शासनाकडून सतत दुर्लक्ष करण्यात आले आहे ,आजही शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव मिळाला नाही, त्यांच्या मागणीसाठी तसेच सर्वसामान्यांच्या हक्कासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार आहे,जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख ,खासदार बळवंत वानखडे, काँग्रेसच्या नेत्या आमदार यशोमती ठाकूर ,माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले जाणार आहे,

देशात कोणीही उपाशी पोटी झोपू नये, प्रत्येकाला अन्न मिळावे यासाठी उन, पाऊस, थंडी, वादळीवारा यांचा विचार न करता, न थकता शेतकरी रात्रंदिवस शेतात काबाडकष्ट करून अन्नधान्य पिकवतो. भारतीय समाज व्यवस्थेतील शेतकरी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपल्या देशातील बहुतांश उद्योगधंदे, पशुधन आणि मानवी जीवन हे शेतीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांनी शेती करणे थांबवील्यास सर्व जनजीवन उध्वस्त होईल. शेतकरी जगेल तरच जग जगेल.



परंतू केंद्र व राज्य सरकारच्या नियतीत खोट असल्याने शासन स्तरावरून शेतकऱ्यांसाठी कोणतीही आर्थिक मदत दिलेली नाही, तर शेतकऱ्यांची कर्जमाफी सुध्दा केलेली नाही. जिल्हा तर मोठ्या प्रमाणात अवकाळी व अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान झाले ,परंतु याची मदत देखील अद्याप शेतकऱ्यांना पोहोचली नाही, मागील वर्षी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पीक विमा काढला परंतु यातील ५०% शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कमच मिळाली नाही ,अलीकडे मोठ्या आर्थिक लाभाच्या योजना शासन जाहीर करीत आहे परंतु जुन्या योजनांचे पैसे मात्र रोखून ठेवलेले आहे ,आजही निराधार योजना असो की आवास योजना असो याचा निधी शासन स्तरावर रखडलेला आहे, त्यामुळे कित्येकांची घरकुल अर्धवट आहेत कित्येक लाभार्थी निधी अभावी घराचे बांधकाम सुरू केल्याने रस्त्यावर आलेले आहेत, चांदूरबाजार तालुक्यात मोठ्या प्रमाणात पावसामुळे नुकसान शेतीचे नुकसान झाले परंतु याचेही मदत शेतकऱ्यांना मिळाली नाही ,यावरून हे केंद्र व राज्य सरकार शेतकरी विरोधी असल्याचे दिसून येत आहे, या सरकारच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी रमेश चेन्निथलाजी प्रभारी महाराष्ट्र यांच्या आदेशावरून प्रांताध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशावरून जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे, गुरुवारी ८ ऑगस्ट रोजी इर्विन चौकातून या मोर्चाला सुरुवात होणार आहे त्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने या मोर्चा सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केलेले आहे.